# मराठी प्रबोधन २०१७-२०१८

## मराठी प्रबोधनविषयी

मराठी प्रबोधन हे क.जे.सोमैया कला वाणिज्य महाविद्यालयाचे भाषा व वाङ्मय मंडळ असून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासाकरता प्रबोधन सातत्याने कार्यरत आहे.त्यांच्या व्यक्तिमत्वास सामाजिक,सांस्कृतिक परिमाणे मिळावी या दृष्टीने प्रबोधन विविध स्पर्धा व कार्यक्रमांचे आयोजन करीत असते.

## मराठी प्रबोधनचे उद्घाटन

संकल्पनेवर आधारित कार्यक्रम हे नेहमीच प्रबोधनच्या उद्घाटन समारंभाचे वैशिष्ट्य असते.या वर्षी मुंबई या संकल्पनेवर आधारित कार्यक्रम उद्घाटनाला सादर झाला. सुरूवातीला तरूण कलावंत अक्षय शिंपी व धनश्री खंडकर यांनी मुंबईवरील साहित्याचे अभिवाचन केले.त्यानंतर प्रबोधनच्या पन्नास विद्यार्थी कलावंतांनी मुंबई या संकल्पनेवर आधारित नृत्य,नाट्य ,संगीतमय कार्यक्रम सादर केला. मुंबई याच विषयावरील विद्यार्थ्यांनी लिहिलेल्या व संपादित केलेल्या आशय या विशेषांकाचे प्रकाशन अक्षय शिंपी व धनश्री खंडकर यांच्या हस्ते करण्यात आले. प्राचार्या डॉ. सुधा व्यास यावेळी उपस्थित होत्या.

## महाविद्यालयीन व आंतरमहाविद्यालयीन स्पर्धा

२०१७-२०१८ या शैक्षणिक वर्षात ११ महाविद्यालयीन व३आंतरमहाविद्यालयीन स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.

महाविद्यालयीन स्पर्धा :

१. हस्ताक्षर स्पर्धा २ शुध्दलेखन ३ रांगोळी ४ निबंध ५ शुभेच्छा कार्ड बनवणे

६ मराठी बोला दोन मिनिटात ७ वक्तृत्व ८ काव्यवाचन ९ सुगम संगीत
१० कथाकथन ११एकपात्री अभिनय

आंतरमहाविद्यालयीन स्पर्धा :

१ जी.ए.कुलकर्णी स्मृती कथाकथन
२ आचार्य अत्रे रंगमंचीय कलाविष्कार
३ ज्योत्स्ना भोळे सप्तसूर माझे

यंदा आंतरमहाविद्यालयीन जल्लोष स्पर्धोत्सवात मुंबई आणि ठाणे परिसरातील १३ महाविद्यालये सहभागी झाली होती.



आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेतील विजेते कलावंत

## बाहेरील उपक्रमांतून सहभाग

- प्रबोधनच्या विद्यार्थ्यांनी यंदा केळकर वझे महाविद्यालयाच्या मंथन या स्पर्धोत्सवावरही ठसा उमटवून सर्वाधिक सहभागाचे पारितोषिक मिळवले.तसेच कोमल दवणे,गौतम पवार,रुपाली शिंदे या विद्यार्थ्यांनीही वैयक्तिक पारितोषिके प्राप्त केली.

- सायली जाधव ही विद्यार्थिनी कोकण मराठी साहित्यपरिषदेच्या युवा कट्ट्याच्या विविध कार्यक्रमात कलावंत म्हणून सहभागी झाली तर नितेश शिंदे हा द्वितीय वर्ष कला शाखेतील विद्यार्थी थिंक महाराष्ट्र डॉट कॉम या मराठी वेब पोर्टलकरता अधून मधून योगदान देतो. महाराष्ट्रातील विविध गावांची माहिती तो एकत्र करीत आहे.
- मितेश जोशी हा प्रथम वर्ष कला शाखेचा विद्यार्थी लोकसत्ताकरता कलावंतांच्या मुलाखती घेतो.

- डी.एस्.हायस्कूल येथे २३ आणि २४ डिसेंबर २०१७ रोजी आयोजित पालकसंमेलनास तृतीय वर्ष व द्वितीय वर्ष कला शाखेच्या निवडक विद्यार्थ्यांनी भेट दिली आणि मातृभाषेतील शिक्षणाचे महत्व समजून घेतले.



- चेंबूर येथील आचार्य महाविद्यालयातील व्याख्यानमालेतील अक्षरनामा या वेब पोर्टलचे संपादक राम जगताप यांच्या प्रसारमाध्यमावपील व्याख्यानासही हजेरी लावली,अशाप्रकारे आपले विद्यार्थी सामाजिक,सांस्कृतिक उपक्रमांशी कसे जोडले जातील याकडे मराठी विभाग व प्रबोधनने कायमच लक्ष दिले आहे.

- समाज आणि साहित्य हा  मराठीच्या अभ्यासक्रमातला महत्त्वाचा भाग.आदिवासी आश्रमशाळेतील मुलांकरता मराठी विभाग कार्यशाळांचे आयोजन करतो.सामजिक उपक्रमाचा भाग म्हणून यंदाही हस्तकला विषयक कार्यशाळा जुम्मापट्टी,नेरळ येथील माणगाववाडी आश्रमशाळेत २९ मार्च रोजी आयोजित करण्यात आली.तृतीय वर्ष कला शाखेचे निवडक विद्यार्थी या उपक्रमात सहभागी झाले.आश्रमशाळेतील जवळपास १ ० ० विद्यार्थी या उपक्रमात सहभागी झाले होते.






माणगाववाडी आश्रमशाळेत

## तिळगुळ समारंभ


जानेवारी महिन्यातील संक्रांतीचा सण दरवर्षीप्रमाणे याही वर्षी विभागाने उत्साहात साजरा केला.स्नेहभाव जपण्याची व वृध्दिंगत करण्याची सातत्यपूर्ण परंपरा हे प्रबोधनचे वैशिष्ट्य आहे.प्राचार्यांसह विद्यार्थी,प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी एकत्र तिळगुळाचा आनंद लुटला.



तिळगुळ घ्या –गोड गोड बोला

## रंगवैखरी- मराठीच्या पाऊलखुणा

यावर्षी प्रथमच महाराष्ट्र शासनाच्या मराठी भाषा विभागाने मराठी भाषेचे पैलू, प्रवास अशा अंगाने ४५मिनिटांचे रंगमचीय कलाविष्कार सादरीकरण - रंगवैखरी ही स्पर्धा आयोजित केली होती.प्रबोधनचे ४०विद्यार्थी या स्पर्धेत सहभागी झाले होते. प्राथमिक फेरीत प्रबोधनचा मराठीच्या पाऊलखुणा हा रंगमंचीय कलाविष्कार विभागीय स्पर्धेकरता निवडला गेला आणि या पहिल्या फेरीत द्वितीय वर्ष कला शाखेतील भाग्यश्री देशपांडे हिला गुणवत्तेचे विशेष प्रमाणपत्र मिळाले.विभागीय स्पर्धेत घवघवीत यश संपादन करून आणि २५हजार रुपये तसेच ६वैयक्तिक बक्षिसे मिळवून महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला.


महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था

रंगवैखरी

कलाबिंब:
मराठी भाषा-संस्कृतीचे

नाट्य, चित्र, शिल्प, संगीत
या कलांचा
एकात्म नाट्याविष्कार

# प्र मा ण प त्र

राज्य मराठी विकास संस्थेने आयोजित केलेल्या "महाराष्ट्री ते मराठी" या विषयावरील 'रंगवैखरी' या राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन नाट्याविष्कार स्पर्धेच्या मुंबई या केंद्रावर दि. १६ / ०२ / २०१८ रोजी झालेल्या विभागीय अंतिम फेरीतून के. जे. सोमय्या कला आणि वाणिज्य महाविद्यालय या महाविद्यालयाचा मराठीच्या पाऊलखुणा हा नाट्याविष्कार दि. २४ फेब्रुवारी, २०१८ रोजी यशवंत नाट्यमंदिर, माटुंगा येथे होणाऱ्या महाअंतिम फेरीसाठी निवडण्यात आला आहे. त्याबद्दल हे प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

प्रभारी संचालक,
राज्य मराठी विकास संस्था मुंबई

उपाध्यक्ष, मंत्री,
मराठी भाषा विभाग, महाराष्ट्र राज्य

अध्यक्ष, मुख्यमंत्री,
महाराष्ट्र राज्य



मराठीच्या पाऊलखुणा ह्या रंगमंचीय कलाविष्काराचे विभागीय स्पर्धेतील यश



यानंतरच्या राज्यस्तरीय स्पर्धेत मुंबईतून सहभागी होण्याचा मान महाविद्यालयाने मिळवला.रंगवैखरीच्या अंतिम फेरीकरता संस्कृत विभागाचे प्राध्यापक व लेखक..दिग्दर्शक प्रसाद भिडे यांचे विशेष मार्गदर्शन लाभले.

## मराठी भाषा दिवस

२७ फेब्रुवारी हा मराठी भाषादिन महाविद्यालयाच्या कालिदास सभागृहात उत्साहात साजरा झाला.रंगवैखरीत गाजलेला मराठीच्या पाऊलखुणा हा आविष्कार विद्यार्थ्यांनी सादर केला..मराठी भाषेच्या या नृत्य,नाट्य व संगीतमय कार्यक्रमाला रसिकांची भरभरुन दाद मिळाली,प्रारंभी प्राचार्या डॉ.सुधा व्यास यांनी मराठीतून शुभकामना दिल्या.या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ कवी अशोक नायगावकर उपस्थित होते.मराठीपणाचे विविध पैलू उलगडत नायगावकरांनी त्यांच्या खास शैलीत वेगवेगळ्या आशयाच्या कविता सादर केल्या.विद्यार्थ्यांच्या सादरीकरणालाही त्यांनी मनमोकळी दाद दिली.यावेळी प्रबोधनच्या सातत्यपूर्ण काम करणार् या कार्यकर्त्यांना पुस्तक भेट देऊन त्यांचे कौतुक करण्यात आले.







**क्षेत्रभेट**

क्षेत्रभेटी हा महाविद्यालयीन जीवनाचा महत्वाचा भाग होय.यावर्षी दिनांक १ डिसेंबर २०१७ रोजी तृतीय वर्ष कला शाखेच्या विद्यार्थ्यांनी प्रा. अभिजित देशपांडे यांच्यासोबत वसई येथील किल्ल्याला भेट दिली.तसेच अर्नाळा येथील चर्चही पाहिले.फादर मायकेल रोजारिओ यांनी या पुरातन चर्चविषयी तसेच वसईच्या ख्रिश्चन मराठी संस्कृतीविषयी विद्यार्थ्यांना माहिती दिली.



वसईच्या किल्ल्याला भेट



फादर मायकेल रोझारियो यांच्यासोबत अर्नाळा चर्च येथे

अशाप्रकारे हे वर्ष नवनवीन अनुभवांनी परिपूर्ण ठरले.

मराठी प्रबोधन कार्याध्यक्षा....डॉ वीणा सानेकर

सहयोगी प्राध्यापक....     प्रा.अभिजित देशपांडे
प्रा.अमोल भोसले

कनिष्ठ महाविद्यालय....     प्रा.सुचेता  नलावडे
प्रा.मीरा कुलकर्णी

.

---